# कोणी ऐकतंय का ?

इंग्लंडमध्ये एका चर्चासत्रात भाग घ्यायला मिळाला. एका इंग्रज गृहस्थाचा भारतीय सामाजिक प्रश्नांचा सखोल अभ्यास त्याच्या बोलण्यातून जाणवला. सत्र संपल्यावर आम्ही भारतीय मंडळींनी त्याचं कौतुक केलं. त्यानेही आम्हाला सांगितलं, की इंग्रजी ही परकीय भाषा असूनही अनेक भारतीय ती उत्तम बोलू शकतात, लिहू शकतात आणि समजूही शकतात, याचं त्यालाही खूप कौतुक वाटत होतं. मी म्हटलं, 'तुम्ही ब्रिटिशांनी आमच्यावर दीडशे वर्षं राज्य केलेलं आहे. त्यामुळे आम्ही इंग्रजी चांगलं बोलू शकतो, यात फारसं नवल नाही. आम्ही जर तुमच्यावर असं राज्य केलेलं असतं, तर कदाचित आम्ही तुमच्या मराठी किंवा हिंदी भाषेचं आता कौतुक केलं असतं. जसं तुम्ही आमच्या इंग्रजीचं करता आहात तसंच !'

कोणत्याही भाषेत विचार मांडायला त्या भाषेची शब्दसंपत्ती आपल्यापाशी भरपूर असायला हवी. आपल्याला साधारण जेवढ्या शब्दांचा अर्थ ऐकताना समजतो, त्याचा फक्त तिसरा हिस्सा एवढेच शब्द आपल्याला प्रत्यक्ष वापरता येतात. म्हणजे जर एखाद्या भाषेचं शब्दभांडार आपल्याला २५ हजार शब्दांइतकं वाढवायचं असेल, तर त्या भाषेतील साधारण ७५ हजार शब्द आणि त्यांचा वापर आपल्याला माहीत असायला हवा.

शब्दसामर्थ्य ही माणसाला मिळालेली सर्वांत मोठी देणगी आहे. ज्ञान आणि अनुभव यांची देवाणघेवाण शब्दांमुळेच शक्य झालेली आहे. दुसऱ्याने

बोललेले आपण समजू शकतो आणि आपले विचार दुसऱ्यांना सांगू शकतो, हा एक मोठा चमत्कारच आहे. जे आपल्याला माहीत आहे, ते दुसऱ्याला सांगावे ही ऊर्मी प्रत्येकाच्या मनात असतेच. पण त्यामुळे स्वतःच बोलण्याकडे म्हणजे बोलतच राहण्याकडे प्रवृत्ती असते, पण आपली भाषा आणि शब्दभांडार समृद्ध होण्यासाठी ऐकणे जास्त महत्त्वाचे आहे. श्रवण आणि वाचन हे आपल्या ज्ञानात भर टाकण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे.

श्रवणभक्ती ही खरी ज्ञानाची म्हणजेच सरस्वतीची उपासना आहे. एकाग्र होऊन ऐकणं ही अवघड अशी एक कला आहे. आपले विचार आपल्याला भलतीकडेच भरकटत नेतात आणि ऐकलेले किंवा वाचलेले शब्द आतापर्यंत पोहोचतच नाहीत. त्यांच्या अर्थाचं भावन होत नाही, म्हणजे ज्ञानसंपादन करण्याऐवजी आपण आपला वेळ मात्र फुकट घालवत असतो. आचार्य विनोबाजी भावे यांचं अनेक भाषांवरचं प्रभुत्व अगदी वादातीत होतं. आपण समजू शकतो तो शब्दसंख्या आणि वापरू शकतो ती शब्दसंख्या यातलं तीनास एक हे प्रमाण त्यांना मान्य नव्हतं. ते म्हणत, देवाने फक्त ऐकण्यासाठी आपल्याला दोन कान दिले आहेत. जीभ मात्र एकच दिली आहे. तिला रस चाखणं आणि बोलणं अशी दोन कामं दिली आहेत. त्यामुळे बोलण्याच्या चौपट ऐकण्याचं काम करायला हवं. तरच तुमची ज्ञानसाधना नीट होईल. आता वाचायला परत दोन डोळे दिलेले आहेत. म्हणजे ऐकणं आणि वाचणं हे बोलण्याच्या आठपट तरी हवं.

गणित कसंही मांडलं, तरी आपण भरपूर ऐकल्या-वाचल्याशिवाय आपल्याजवळ सांगण्यासारखं काही असण्याची शक्यताच कमी. मग उगीच बडबड कशाला ?

---

**– भीष्मराज बाम**

**('मना सज्जना' या पुस्तकातून)**